झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोनिआ/३९५/२०२२
दिनांक १२/०५ /२०२२

## झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पुर्वसूचना)

### महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम, १९७१ कलम ३ ड अन्वये

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे 'उक्त अधिनियम' असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.१९/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद मौजे कोथरुड, स.नं.२५/१, सि.स.नं.६६०पै., गोसावी वस्ती, हॅप्पी कॉलनी, पुणे या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ ३०६१.०७ चौ.मी. (३क आदेशानुसार) (प्रस्तुत आदेशात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. ग्रेस डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०९/१०/२०१९ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदर प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४(५) च्या तरतूदीनुसार दि.३१/०३/२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रातील झोपडपट्टी क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ठ २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट-२ नुसार सदर मिळकतीवर एकूण १३० झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी ९८ व पात्र बिगरनिवासी ०३ याप्रमाणे एकुण १०१ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत; आणि

ज्याअर्थी, सदर मिळकतीकरिता महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३(क) अन्वये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांचेमार्फत जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/१९६/२०२२ दि.२३/०३/२०२२ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन आदेश अंतिम करणेत आला आहे. सदर आदेश स्थानिक वृत्तपत्रात दै.विश्वेश्वर व दै.सांजमहानगरी दि.०६/०४/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे व महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१ पुरवणी मध्ये मार्च ३१ ते एप्रिल ६, २०२२ रोजीच्या

राजपत्रात पान क्र.७ व ८ वर प्रसिध्द करणेत आला आहे व दि.०७/०४/२०२२ रोजी सदर आदेश झोपडपट्टी क्षेत्रातील जागेवर डकविण्यात आला आहे; आणि उक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेशास मा.शिखर तक्रार निवारण समिती, मुंबई अथवा कोणत्याही न्यायालयाची स्थगिती नाही आणि म्हणून, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी या क्षेत्रातील सर्व इमारती/झोपडया पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, विकसक मे.ग्रेस डेव्हलपर्स यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते भाडे तत्वावर स्थलांतरण करणेबाबतची जबाबदारी विकसक या नात्याने घेत असलेबाबतचे दि.१०/०५/२०२२ रोजीचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर केले आहे; आणि

ज्याअर्थी, या कार्यालयामार्फत विषयांकित मिळकतीच्या ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर स्थळ पाहणी केली असता काही झोपडया पाडून रिकामी केल्याचे व काही झोपडया जागेवर असल्याचे निदर्शनास आले आहे असा स्थळ पाहणी अहवाल दि.१०/०५/२०२२ रोजी सादर केला असून प्रकरणी दाखल करण्यात आला आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र (पुर्वसूचना)' म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

सदर क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळवित आहे की,-

१) उक्त क्षेत्रावरील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये ३० दिवसांचे आत त्यांची झोपडी रिकामी करून झोपडी व त्याखालील जागा विकसकाच्या ताब्यात द्यावी.

२) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन खुली करावी.

३) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपण्यापूर्वी इमारत पाडून टाकण्यात आली नसल्यास इमारतीत प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

४) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

३२२

५) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये सदरचा आदेश कायम करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

अनुसूची

| गाव | स.नं./ सि.स.नं. /फा.प्लॉ.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (मोजणी नकाशा नुसार रस्त्या अंतर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे कोथरुड | स.नं.२५/१, सि.स.नं.६६० पै., गोसावी वस्ती, हॅप्पी कॉलनी, कोथरुड | पुणे महानगरपालिका | ३०६१.०७ चौ.मी. | पुर्वेस - लागू कॅनॉल<br>पश्चिमेस - लागू स.नं.१६८<br>दक्षिणेस - लागू प्लॉ.नं.२६ व स.नं.२५ पैकी<br>उत्तरेस - लागू स.नं.१६६ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना १०/६/२००५ पुणे

१२.५.२०२२

(राजेंद्र निंबाळकर) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :-१२/०५/२०२२

प्रत- १. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव
२. सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपुप्रा, पुणे पुढील उचित कार्यवाहीकरिता.
३. व्यवस्थापक मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-४११००२

पुणे महानगरपालिका
महापालिका आयुक्त कार्यालय
शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५
दिनांक